# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


## : विषय:

फुलांची सजावट करण्याकरीता मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.

---

दि. २५ जुलै, २०२६ (आषाढी एकादशी), दि. २९ जुलै, २०२६ (गुरूपौर्णिमा) निमित्त न्यासातर्फे फूलांची सजावट करण्यासाठी विहित पध्दतीने दरपत्रके प्रक्रिया राबवून कामाचे कंत्राट देण्याच्या अनुषंगाने मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

---

| | |
|---|---|
| दरपत्रके सुचना प्रसिध्दीचा वार व दिनांक | – शनिवार , दि. १० जुलै, २०२६ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – बुधवार , दि. १५ जुलै, २०२६, सांय ५.०० वा. पर्यंत. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – गुरूवार , दि. १६ जुलै, २०२६, दु २.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक: ०७ जुलै, २०२६

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय: फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

दि. २५ जुलै, २०२६ ( आषाढी एकादशी ), दि. २९ जुलै, २०२६ ( गुरूपौर्णिमा ), या कालावधीमध्ये फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

अटी व शर्ती :–

१. बुधवार , दि. १५ जुलै, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावा.

२. गुरूवार , दि. १६ जुलै, २०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

३. दरपत्रक सादर करताना दरपत्रकातील **(BOQ)** नमूदप्रमाणे रक्कम भरावी.

४. तांत्रिक कागदपत्रे **(Technical Document)** व मुल्य दर **(BOQ)** असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मुल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

५. ए–४ साईजचे मोठे लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)

ब) पॅनकार्ड.

क) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५)

ड) अनुभवाचा दाखला. (किमान ३ वर्ष काम केल्याचा)

या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.

७. दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

८. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास तद्नंतर आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे.

१०.दरपत्रकधारकारांनी सर्व **BOQ** मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. लेबर मजूरी व वाहतूक खर्च) मुल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

११.दरपत्रकधारकाचे दुकान/फर्म/कंपनी किमान ३ वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.

१२.दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य मोठया धार्मिक समारंभात ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने किमान ३ वर्ष कामाचा अनुभव असावा. यासंबधातील प्रमाणपत्र/दाखला किंवा कार्यदिशाची पुरवठा आदेश/देयके यांपैकी एकाची प्रत तांत्रिक लिफाफ्या मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

१३.काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाईची रक्कम आपल्या बिलातून वजा करण्यात येईल.

१४.श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास **L-1** दरपत्रकधारकाचे काम असमाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार **L-2** दरपत्रकधारकाराला कार्यादेश देवू शकतो.

१५.दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह (लेबर व वाहतूक खर्च) भरून रक्कम भरावी.

१६.कार्यादेशाप्रमाणे काम करीत असल्याबाबत परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

१७.प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार देयकामध्ये आवश्यक ती कर कपात केली जाईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८.काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


१९.कंत्राटदाराने नियुक्त केलेली पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

२०.दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

२१.दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील स्वतः करणे बंधनकारक राहील. निकृष्ट दर्जाचे काम केल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

२२.कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

२३.उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२४.दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून दरपत्रक सादर करावे. दरपत्रकासंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८

ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४

क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११

ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय
दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२

Vpatil

(वीणा पाटील)

कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org


दिनांक : दि. ७ जुलै, २०२६

## दरपत्रकाचा तपशील

विषय : दि. २५ जुलै, २०२६ ( आषाढी एकादशी ), दि. २९ जुलै, २०२६ ( गुरूपौर्णिमा) या कालावधीत फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

कंपनीचे नाव:————————————————————

कंपनीचा पत्ता: ————————————————————

————————————————————

कंपनी नोंदणी क्रमांक : ————————————————————

जी एस टी क्रमांक : ————————————————————

पॅन कार्ड क्रमांक : ————————————————————

| अ. क्र. | दिनांक | फुलांची सजावट करण्यासाठी फूले/साहित्यांचा तपशील | रक्कम (कर वगळून) |
|---|---|---|---|
| १ | २५ जुलै, २०२६ (आषाढी एकादशी) | गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी –२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग | |
| २ | दि. २९ जुलै, २०२६ (गुरूपौर्णिमा) | गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी –२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का